
REGISTERED No. B 3434.

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख ६ ऑगस्ट १९४७ अंक ३२




'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७२८

रामतीर्थ ब्राह्मी तेल



[ स्पेशल नं. १ ]
सर्वत्र मिळतो.

पांढरे केस काळे होतात. स्मरणशक्ति वाढते. टक्कलावर केस उगवतात. शांत झोंप येते. दृष्टि सुधारते. केस लांबसडक होतात. केसांची नीट निगा राखते. डोकेंदुखी थांबते.

मोठी बाटली रु. ३-८-०, लहान बाटली रु. २-०-०

रामतीर्थ योगाश्रम, ४४८ सॅण्डर्स्ट रोड, मुंबई ४




साठे बिस्किटें

ठराविक पुरवठा नियमितपणं दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यातल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल ग्राहकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें !

साठे बिस्किट कंपनी, पुणें २.

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २

## विविध माहिती

**ब्रिटनचें नवें विमान**—हिंदुस्थान व अतिपूर्वेकडील प्रवासासाठीं ब्रिटननें एक मोठें विमान बांधलें आहे. ह्या विमानाचें वजन ३० टन असून त्यांत २२ उतारूंची सोय करण्यांत आलेली आहे. त्याचा वेग ताशीं १७० मैल राहील.

**बल्गेरिआ- युगोस्लाव्हिआ एक होणार ?**—बल्गेरिआचे मुख्य प्रधान एम्. डिमिट्राव्ह नुकतेच युगोस्लाव्हिआंत जाऊन आले. ह्या दोन देशांच्या सरहद्दीवरील एका गांवांत केलेल्या भाषणांत दोन्ही देशांच्या एकत्रीकरणाची संभाव्यता त्यांनीं व्यक्त केली.

**अल्बानिआला रशिआची मदत**—अल्बानिआ आणि रशिया ह्यांच्यांतील वाटाघाटी यशस्वी होऊन रशिआनें अल्बानिआला शेतीचीं अवजारें आणि किरकोळ धंद्यांची यंत्रसामग्री पतीवर देण्याचें कबूल केलें आहे.

**पाकिस्तान अधिकाऱ्यांसाठी जागा**—पाकिस्तानच्या अधिकाऱ्यांना राहण्याची जागा पुरविण्यासाठीं सिंध सरकार १५५ प्राथमिक शाळांच्या इमारतींपैकीं ५० इमारती एक महिनाभर आपल्या ताब्यांत घेणार असल्याचें समजतें. ह्या काळांत कराची म्युनिसिपल स्कूल बोर्ड आपल्या शाळा उघड्यावरच भरविणार आहे अशी बातमी आहे.

**लष्करी छावणीचा विद्यार्थ्यांना उपयोग**—भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेच्या जवळील रिकामी लष्करी छावणी दुरुस्त करून विद्यार्थ्यांना भाड्यानें देण्याचें मुंबई सरकारनें कबूल केलें आहे. ह्या छावणींत सुमारें ४०० विद्यार्थ्यांची सोय होऊं शकेल.

**नवी दिल्ली नव्हे, दिल्लीच**—अमेरिकेंतील एक हिंदी ग्रंथकार, श्री. कुमार रॉय, ह्यांनीं हिंदुस्थान घटना समितीचे अध्यक्ष बाबू राजेंद्र प्रसाद यांना असें सुचविलें आहे कीं ब्रिटिश राजवटींतील 'नवी दिल्ली' हें नांव कायम न ठेवता नुसतें 'दिल्ली' हें इतिहास प्रसिद्ध नांवच हिंदुस्थानच्या राजधानीला ठेवावें.

**चिनी लष्कराला अन्नाचा तुटवडा**—चीनचे अध्यक्ष मार्शल चिआंग कै शेक यांनीं नानकिंग येथें अन्नधान्य परिषदेचें उद्घाटन केलें. ह्या प्रसंगीं बोलतांना चिनी लष्कराला लागणाऱ्या अन्न पुरवठ्याच्या वसुलीच्या कामांत तावडतोब सुधारणा झाली पाहिजे असे उद्गार त्यांनीं काढले.

**जपानशीं तह**—अमेरिकेनें, जपानशीं करावयाच्या तहाची प्राथमिक चर्चा करण्यासाठीं ११ राष्ट्रांची परिषद बोलाविली होती. ही परिषद पुढें ढकलण्यांत यावी अशी मागणी ब्रिटन व ऑस्ट्रेलिआ प्रमाणेंच कानडानेंही केली आहे.

**ॲब्राहम लिंकनच्या आयुष्याचा चित्रपट**—ॲब्राहम लिंकनच्या आयुष्याचा चित्रपट तयार करण्यासाठीं चित्रपट निर्माते त्याच्या संबंधींच्या उपलब्ध कागदपत्रांचा उपयोग करणार आहेत. या कागदपत्रांच्या 'मायक्रो-फिल्म' वर नकला करून त्या ब्रिटन व इतर देशांतून पाठविण्यांत येणार आहेत.

**ब्रिटन-रशिआ करार फिसकटला**—ब्रिटन आणि रशिया यांच्या दरम्यान चाललेलीं व्यापारी कराराचीं बोलणीं फिसकटल्याचें जाहीर झालें आहे. मार्शल योजनेंत रशिआनें भाग घेतला नाहीं आणि हा करारही झाला नाहीं, त्यामुळें रशिआचे पश्चिम युरोपशीं संबंध तुटले आहेत.




—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था
दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २
—आमचीं वैशिष्ट्यें—
( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स तावडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.
विमा अथवा एजन्सी यासाठीं लिहा अगर भेटा.
—मॅनेजिंग डायरेक्टर

THE MYSORE GLASS AND ENAMEL WORKS, LIMITED
*34, Gandhi Nagar,*
*BANGALORE CITY.*

NOTICE.

The Board of Directors of the Company at their meeting held on 21st June 1947 resolved to make a fresh issue of 40,000 shares of Rs. 10/- each at a premium of Rs. 2/- per share. The shares have been offered in the first instance to the present share-holders of the Company at the rate of one share for each share held by them. Share-holders, whose names appear on the Books of the Company on the 15th day of August 1947 will alone be qualified to apply for the new shares.

The application forms will be posted to the share-holders on or after the 15th August 1947 and they are therefore requested to notify any change of address to the Company immediately.

By Order of the Board of Directors,
**SHANKARRAO P. OGALE**
*Managing Agent.*

Dated 28th July 1947.
34, Gandhi Nagar,
Bangalore City.

# अर्थ

बुधवार, ता. ६ ऑगस्ट, १९४७

संपादक :
श्रीपाद वामन काळे
वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.




प्रो. वा. गो. काळे

## आपल्या देशाची आर्थिक स्थिती

### रिझर्व्ह बँकेचा रिपोर्ट

रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती डायरेक्टर बोर्डानें ३० जून १९४७ ला संपणाऱ्या वर्षाचा आपला अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. देशांतील आर्थिक व्यवस्थेंतील रिझर्व्ह बँकेचें महत्त्व लक्षांत घेतां या वार्षिक अहवालाकडे इतर कंपन्या, बँका वगैरेंच्या वार्षिक वृत्तांतापेक्षां निराळ्या दृष्टीनें पहाण्यांत येते. कारण, रिझर्व्ह बँकेच्या व्यवहाराचा आढावा घेणें इतकेंच या अहवालाचें कार्य नसून देशाच्या आर्थिक परिस्थितीचें दिग्दर्शन करून ती सुधारण्यासाठीं योग्य सूचना करणें ही कामगिरी देखील त्यांत बजावलेली असते. हिंदी जनतेकडे राजकीय सत्ता यंदापासूनच येणार असल्यामुळें व त्या सत्तेचा उपयोग आपल्यापुढें उभ्या असलेल्या बिकट प्रश्नांना तोंड देण्यासाठीं केला जाईल अशी सार्वत्रिक अपेक्षा असल्यामुळें यंदाच्या रिझर्व्ह बँकेच्या अहवालाला अधिकच महत्त्व प्राप्त झालेलें आहे, आणि या जाणिवेनेच कीं काय यंदाच्या अहवालांत देशांतील आर्थिक घटनांवर रिझर्व्ह बँकेनें आपलें स्पष्ट मत निःसंकोचपणें मांडलेलें आहे.

'युद्ध संपून दोन वर्षें झालीं, तरी आपली हलाखी कमी होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत' या सामान्य माणसाला सतत होणाऱ्या जाणिवेची छाया रिझर्व्ह बँकेच्या अहवालावरही पडलेली दिसते. देशांतील जातीय दंगल आणि राजकीय अस्वस्थता यांचा परिणाम ही हलाखीची परिस्थिति अधिकच बिघडविण्यांत झाला. युद्धकाळीं झालेल्या भरमसाट चलनवाढीनें किंमतींत सुरू झालेली चढती खालीं येण्याचीं चिन्हें अजून दिसत नसल्यामुळें मजूर व मध्यमवर्गीय जनतेची कुचंबणा तशीच चालू आहे. त्यांतच परदेशांतील पेठांत युद्ध संपतांच मंदीची छाया पसरेल ही अटकळ चुकीची ठरल्यामुळें येथील किंमती उतरवण्याचें बाहेरील दडपण नाहींसें झालें. या सर्वांचा परिणाम म्हणजे आज देशाच्या आर्थिक व्यवस्थेवर फारच ताण पडत असून योग्य मार्गाचा अवलंब न केल्यास ती लवकरच कोलमडून पडणें अगदीं संभवनीय आहे असा गंभीर इषारा रिझर्व्ह बँकेनें सरकार व जनता या दोघांसही दिला आहे.

मजुरीचे दर स्थिर करणें, अन्नधान्याची तरतूद करणें, किंमतीवरील नियंत्रण परिणामकारक करणें, परदेशी व्यापार देशाच्या गरजेप्रमाणें वळविणें, सट्टेबाजी काबूंत आणणें, इत्यादि अनेक बिकट पण निकडीचे प्रश्न नव्या सरकारला हाताळावे लागतील. त्यांतील अमुक अधिक महत्त्वाचा व अमुक कमी महत्त्वाचा असें म्हणतां यावयाचें नाहीं. पण या सर्वांवरही ताण करणारा प्रश्न म्हणजे चोहोंकडे पसरलेली लांचलुचपत आणि काळा बाजार. जोंपर्यंत या सामाजिक गुन्ह्यांना आळा घातला जाणार नाहीं, तोंपर्यंत सरकारनें अंगिकारलेल्या कोणत्याही आर्थिक नियोजनाच्या धोरणाला यश येणें शक्य नाहीं.

गेल्या वर्षांतील उत्पादनाचा विचार करतां, रिझर्व्ह बँकेच्या मतें मध्यवर्ती सरकारच्या बजेटांतील नव्या करवाढीचा परिणाम उद्योगधंद्यांच्या वाढीस मारक ठरला असें दिसतें. त्यामुळें नवीन धंदे काढण्यास आळा बसला. चालू उद्योगधंद्यांतील उत्पादन देखील गेल्या वर्षांत पूर्वीपेक्षां घटलें. त्याचा परिणामही किंमती वाढण्याकडेच झाला. घाऊक किंमतींचा निर्देशांक जुलै १९४६ त २७० होता तो यंदाच्या मे महिन्यांत २९० पर्यंत चढला. त्यांतच सप्टेंबर १९४६ पासून सरकारी नियंत्रणें ढिली करण्याचें धोरण अवलंबिल्यामुळें किंमतींची चढती सतत चालू राहिली.

मार्चअखेरच्या नऊमाहींत आपल्या परदेशी व्यापाराची किंमत ४८० कोटी रु. झाली. गतवर्षीच्या याच कालावधींत ती ३९१ कोटी होती. या आंकड्यावरून दिसून येणारी सुमारें ९० कोटींची वाढ मुख्यतः आयातींतील सुधारणेमुळें घडून आली. आयात मालाची किंमत १७७ वरून २४० कोटींवर व निर्यातमालाची किंमत २१३ वरून २४० कोटींवर गेली.

आयातीसाठीं लागणाऱ्या परदेशी चलनाच्या मागणीमुळें रिझर्व्ह बँकेची परदेशांतील ठेव ( स्टर्लिंग शिल्लक ) १२८ कोटींनीं कमी झाली. युद्ध सुरू झाल्यापासून या वर्षी प्रथमच स्टर्लिंग शिलकींत वाढ होण्याचें थांबलें. युद्ध संपल्यानंतरही ही शिल्लक वाढूं लागल्यामुळें देशांतील अर्थशास्त्रज्ञांनी सरकारचें लक्ष या अनिष्ट घटनेकडे वेधलें होतें. परंतु त्याचा तादृश परिणाम न होता युद्धानंतरच्या गेल्या वर्षांत या शिलकींत आणखी २७१ कोटींची भर पडली होती. त्यामुळें अहवालाच्या सालीं ही शिल्लक वाढली तर नाहींच, उलट थोडी कमीच झाली हें पाहून समाधान वाटणें साहजिक आहे. ही स्टर्लिंग शिल्लक म्हणजे हिंदी जनतेनें पोटाला चिमटा घेऊन ब्रिटिश सरकारला युद्धकालांत हरतऱ्हेचा माल देऊन केलेली मदत होय. ही मदत अशीच चालू रहाणें म्हणजे अन्नान्न दशेला पोहोंचलेल्या हिंदवासीयांची अमानुषपणें पिळवणूक करणें असल्यामुळें तिच्या वाढीकडे भीतियुक्त नजरेनेंच पहाणें योग्य होतें. यापुढें या शिलकीचा किती भाग आपल्या निकडीच्या गरजा भागविण्यासाठीं मिळणार आहे याकडे सर्वांचें लक्ष लागलें आहे.

शेड्यूल्ड बँकांच्या दर्शनी ठेवींचे एकंदर ठेवींशीं प्रमाण अहवालाच्या सालीं ६५.८२ टक्के होतें. गतवर्षी हें प्रमाण ६९.४७ टक्के होतें. पण या उलट अशा बँकांच्या एकंदर कचेऱ्यांत वाढ झालेली दिसते. गतवर्षी ही संख्या ३,१४५ होती ती यंदा ३,५६६ वर गेली. रिझर्व्ह बँकेच्या स्टर्लिंग ठेवीप्रमाणें बँकांच्या ठेवींतहि घट झालेली दिसून आली.

प्रत्यक्ष रिझर्व्ह बँकेच्या व्यवहाराबद्दल अहवालांत पुढील माहिती मिळते. बँकेचा नफा ८ कोटींवर गेला असून कायद्याप्रमाणें त्यापैकीं २० लक्ष रुपये भागीदारांस शे. चार टक्के प्रमाणें वाटण्यांत आले आहेत, व राहिलेली ७ कोटी, ८० लक्षांवर रकम मध्यवर्ती सरकारच्या तिजोरींत भरणा झाली आहे. भागीदारांची संख्या ४५,६९२ वरून ४५,०३१ वर घसरली असून मुंबई व विशेषतः कलकत्ता या ठिकाणांकडे शेअर्सचा ओघ चालूं आहे. दर भागीदरामागें सरासरी शेअर्सचें प्रमाण पूर्वीप्रमाणेंच वाढत असून अहवालाच्या सालीं हा आंकडा ११·१ वर गेला आहे.

### हिंदी उद्योगधंद्यांसाठी जर्मन तज्ज्ञ आणवा

हिंदी उद्योगधंद्यांच्या विकासासाठी परदेशीय तज्ज्ञांची मदत घ्यावी लागणार याबद्दल दुमत होण्याचें कारण नाहीं. कारण, कोठल्याही मागासलेल्या राष्ट्राला स्वतःचे तांत्रिक तज्ज्ञ निर्माण करीपर्यंत तरी अशी सोय करावीच लागणार. या दृष्टीनें अखिल भारतीय कारखानदार संघटनेचे उपाध्यक्ष, श्री. साखळचंद शहा, यांनीं जर्मन तज्ज्ञ हिंदुस्थानांत आणण्यासंबंधीं केलेली सूचना केवळ विचारार्ह नव्हे तर स्वागतार्ह आहे. इतर पुढारलेल्या देशांतून तज्ज्ञ मिळणारच नाहींत असें नाहीं. तथापि श्री. शहा म्हणतात त्याप्रमाणें एक तर हे तज्ज्ञ भरमसाठ पगार मागतील; शिवाय इंग्लंड-अमेरिकेसारख्या देशांतील तज्ज्ञांची तेथेंच जरूर असल्यानें ते मिळूं शकतीलच असेंही नक्की म्हणतां येणार नाहीं. जर्मनींतील तज्ज्ञांची स्थिति तशी नाहीं. जर्मनीच्या भवितव्याच्या अनिश्चितीमुळें अनेक जर्मन तज्ज्ञांपैकीं कांहीं तज्ज्ञ तरी त्या देशांतून बाहेर पडण्यास तयार आहेत. इतर देशांतून तज्ज्ञ आणविले तरी ते हिंदुस्थानांत दीर्घकाल रहातील कीं नाहीं याची शंकाच आहे. जर्मन तज्ज्ञांना मात्र स्वतःच्या देशांत फारसें आशादायक वातावरण नाहीं. तेव्हां ते हिंदुस्थानांत जवळ जवळ कायमचे राहूं शकतील असें म्हणण्यास हरकत नाहीं. हिंदी उद्योगधंद्यांना या तज्ज्ञांचा उपयोग कितपत होईल अशीही शंका घेण्याचें कारण नाहीं. कारण, अमेरिकेसारखें पुढारलेलें राष्ट्रही जर्मन तज्ज्ञ व शास्त्रज्ञ अमेरिकेंत नेत आहे. जर्मन तज्ज्ञांवर राजकारणाच्या दृष्टीनें मात्र जरूर तीं बंधनें घातलीं पाहिजेत. अमेरिकेंत यापैकीं कांहीं तज्ज्ञांनीं फॅसिस्ट राजकारणाकडे आपला कल दाखविला व त्यामुळें अमेरिकेंत गवगवा झाला हें विसरून चालणार नाहीं.

---

### उत्तर हिंदुस्थानांतील चहाचे मळे

उत्तर हिंदुस्थानांतील २७ चहाच्या मळ्यांना १९४६ साल एकंदरीनें समाधानकारक गेलें. १९४५ सालाशीं तुलना करतां चहाचें उत्पादन, विक्री आणि नफा ह्यांच्यांत लक्षांत घेण्यासारखी वाढ झाल्याचें दिसून येतें. भागीदारांना वाटावयाच्या नफ्यांत नऊ कंपन्यांनीं वाढ केली, दहा कंपन्यांनीं मागील नफा–वांटणीच चालू ठेवली आणि आठ कंपन्यांनीं नफा–वांटणी कमी केली. तथापि या शेवटच्या गटांत दोन कंपन्यांनीं भागीदारांना बोनस भाग देऊन आपलें भांडवल वाढविलें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. तेव्हां अधिक नफा वाटणाऱ्या कंपन्यांची संख्या ९ न होतां ११ होते. सर्व कंपन्यांचे मिळून उत्पादनाचे, विक्रीचे व नफ्याचे आंकडे पुढील प्रमाणें आहेत:—

| साल | उत्पादन (मण) | विक्री (रु.) | निवळ नफा (रु.) |
|---|---|---|---|
| १९४५ | २,२७,४०८ | १,५६,०१,००० | ३५,५२,००० |
| १९४६ | २,५८,८६५ | १,८२,६०,००० | ४५,७२,००० |

**हिंदुस्थानसाठी टिन**—इंटर नॅशनल टिन स्टडी ग्रुपकडे हिंदुस्थाननें चालू वर्षासाठीं ६,००० टन टिनची मागणी केली होती. परंतु तात्पुरती गरज भागविण्याच्या दृष्टीनें फक्त १,०५० टनच टिन मंजूर करण्यांत आले आहे.

### १९४६ सालांतील औद्योगिक कलह

पंजाब वगळून बाकीच्या ब्रिटिश हिंदुस्थानांत १९४६ सालीं १,६२९ इतके औद्योगिक कलह निर्माण झाले. १९३९ सालीं हाच आंकडा ४०६ होता आणि १९४५ सालीं ८२० होता. ह्या वाढीची टक्केवारी १९३९ व १९४५ शीं तुलना करता ३०१·२ टक्के व ९८·७ टक्के पडते. १९४५ सालीं झालेल्या औद्योगिक कलहांत ७,४७,५२० मजुरांचा संबंध आला होता. १९४६ सालीं १९,६१,९४८ इतक्या मजुरांचा संबंध आला. मजुरांच्या संख्येच्या टक्केवारीच्या दृष्टीनें ही वाढ १६२·५ टक्के पडते. औद्योगिक कारखान्यांच्या स्वरूपाच्या दृष्टीनें विचार करतां कापडाच्या, लोकरीच्या व रेशमाच्या कारखान्यांतून पुढील परिस्थिति नजरेस येते. एकंदर औद्योगिक कलहांपैकीं २८·७ टक्के कलह वरील कारखान्यांतून झाले. कामगारांपैकीं ५३·६ टक्के वरील कारखान्यांतील होते आणि एकंदर कामाच्या दिवसांचें जें नुकसान झालें त्यापैकीं ४१·७ टक्के दिवस वरील कारखान्यांतून वाया गेले. ह्या कारखान्यांच्या खालोखाल औद्योगिक कलह व तज्जन्य नुकसान एंजिनिअरिंगच्या कारखान्यांतून झालें. १९४५ सालीं औद्योगिक कलहामुळें ४०,५४,४९९ कामाचे दिवस वाया गेले. १९४६ सालीं १,२७,१७,७६२ इतके दिवस वाया गेले. १९४५ सालापेक्षां ही वाढ तिपटीपेक्षां थोडी अधिक आहे. १९४६ सालीं पगारावरून झालेल्या औद्योगिक कलहांचें प्रमाण शेकडा ३७·१ पडलें. कापडाच्या, लोकरीच्या व रेशमाच्या गिरण्यांतून याच कारणासाठीं झालेल्या कलहांची टक्केवारी २४ इतकी आहे. गिरण्यांतील हीच टक्केवारी २७ असून रेल्वेमधील १० आहे. पगार व बोनस ह्यांच्यासाठीं झालेल्या औद्योगिक कलहांचें प्रमाण १९४५ सालापेक्षां १९४६ सालीं बरेंच कमी झालें आहे, पण त्याचबरोबर दर माणशीं वाया गेलेल्या कामाच्या दिवसांचें प्रमाण मात्र वाढलें आहे. १९४५ सालीं हें प्रमाण ५·४ होतें तें १९४६ सालीं ६·५ झालेलें आढळून आलें. प्रांतिक वर्गवारीच्या दृष्टीनें मुंबई प्रांतांत सर्वांत अधिक म्हणजे ५४२ औद्योगिक कलह निर्माण झाले, आणि त्यांत ७,७८,११३ मजुरांचा संबंध आला. मुंबईच्या खालोखाल बंगालचा नंबर लागतो. १९४६ मधील संपांची लाट मार्चमध्यें उसळली, जुलैमध्यें शिगेला पोंचली व ऑगस्टपर्यंत तशीच राहून ह्यानंतर ओसरूं लागली.

---

### ग्रेट ब्रिटनमधील मोटारींवरील कर

ग्रेट ब्रिटनमध्यें मोटारगाड्यांवरील कर त्यांच्या हॉर्स पॉवरच्या प्रमाणांत आकारण्यांत येतो. ह्या कारणानें, कमी हॉर्स पॉवरच्या मोटार गाड्या उत्पादन केल्या जातात; निर्गत व्यापारास त्यामुळें अडथळा येतो; बाहेरील देशांत मोठ्या गाड्यांना मागणी ज्यास्त असते. मोटारींवरील प्रस्तुत करपद्धति सुधारून प्रत्येक गाडीवर दरसाल १० पौंड कर घेण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें आहे. १९४८ पासून हा नवा कर अंमलांत येईल. इंजिनाच्या आकारावरील कराऐवजी सरसकट एक कर बसविण्याच्या ह्या योजनेचें ब्रिटिश मोटार कारखानदारांनीं स्वागत केलें आहे. मोठ्या मोटार गाड्यांचें उत्पादन ते आतां हातीं घेऊं शकतील आणि ती मागणी पुरी पाडण्याच्या दृष्टीनेंच आपल्या मोटारींची हॉर्सपॉवर आतां ठरवितील. कर आकारणींतील ही सुधारणा डॉ. डाल्टन ह्यांनीं आपल्या पहिल्या अंदाजपत्रकाचे वेळींच केली असती, तर ब्रिटिश कारखानदारांना पुरेसा वेळ मिळून ब्रिटिश मोटारींची मोठ्या प्रमाणावर निर्गत एव्हांना सुरू झाली असती, अशी टीका करण्यांत येत आहे.

### मद्रास प्रांतांतील मोटारवहातुकीचें राष्ट्रीयकरण

युद्धोत्तर पुनर्घटना खात्याच्या जनरल कमिटीनें आपल्या अहवालांत, सार्वजनिक उपयोगाच्या सुखसोयी राष्ट्रीय मालकीच्या आणि राष्ट्रीय चालकत्वाखालीं असाव्यां अशी शिफारस केली आहे. त्या शिफारसीस अनुसरून मद्रास प्रांताच्या सरकारनें प्रांतांतील मोटार वहातूक आपल्या ताब्यांत घेण्याचें कांहीं दिवसांपूर्वी ठरविलें. मद्रास सरकारची ही योजना पांच वर्षांच्या कालांत पूर्णपणें अमलांत यावयाची आहे. योजनेंतील पहिलें पाऊल म्हणून सरकारनें मद्रास शहरांतील बसची वहातूक ता. १ ऑक्टोबर पासून आपल्या नियंत्रणाखालीं घेण्याचें जाहीर केलें आहे. सरकारनें या योजनेसंबंधीं जें पत्रक काढलें आहे, त्यांत राष्ट्रीयकरणाच्या योजनेचा हेतु स्पष्ट केलेला आहे. जनतेच्या वहातुकीची व प्रवासाची कार्यक्षम आणि स्वस्त सोय करणें हा ह्या योजनेचा प्रधान हेतु आहे. रेल्वेची वहातूक आणि मोटारींची वहातूक यांचे सहकार्य होणें जरूर असल्यामुळें रेल्वेजनाही या योजनेंत वाटा देण्यांत आला आहे. याशिवाय ठिकठिकाणच्या स्थानिक स्वराज्य संस्था आणि खाजगी मोटार मालक ह्यांनाही त्यांत गुंतविण्यांत आले आहे. अर्थात्, खाजगी मोटार मालकांना फारसा वाव देण्यांत आलेला नाहीं. योजनेसाठीं लागणाऱ्या भांडवलांत सरकारचा हिस्सा ५१ टक्के राहाणार आहे, स्थानिक स्वराज्य संस्थांचा हिस्सा २० टक्के रहाणार आहे. रेल्वेजना १५ टक्के आणि खाजगी मोटार मालकांना १४ टक्के हिस्सा देण्यांत येणार आहे. भागीदारांना आपले भाग वर्ग करता येणार नाहींत; मात्र ते प्रांतिक सरकारला विकता येतील 'अगर सरकार सूचना' देईल त्याप्रमाणें त्यांची व्यवस्था करता येईल. भागीदारांना ६½ टक्क्यापेक्षा अधिक नफा वाटण्यांत येणार नाहीं. नफा वाटल्यावर जी शिल्लक राहील तिचा विनियोग सरकारला वाटेल त्याप्रमाणें करता येईल. वर सांगितलेल्या प्रमाणांत भागीदारांनीं भाग घेतले नाहींत तर उर्वरित भाग प्रांतिक सरकारच घेईल. राष्ट्रीयकरण झालेल्या ह्या धंद्याचा रोजचा व्यवहार पाहण्यासाठीं एक ट्रॅन्स्पोर्ट बोर्ड स्थापन करण्यांत येणार आहे. त्याच्याकडे प्रांतांतील मोटार वहातुकीचा दैनंदिन कारभार सोंपविण्यांत येईल. जिल्ह्यांतील वहातुकीसाठीं प्रत्येक जिल्ह्यांत एक अधिकारी नेमण्यांत येईल. प्रांतांतील खेडोपाडीं जाणाऱ्या मोटार वहातुकीचे परवाने दर वर्षी कांहीं ठराविक प्रमाणांत रद्द करण्यांत यावयाचे आहेत. परवान्याची जितकी मुदत राहिली असेल त्याबद्दल मुंबई सरकारनें ठरविलेल्या श्रेणीप्रमाणें मालकांना नुकसानभरपाई देण्यांत येणार आहे.

---

**जपानमध्यें हिंदी विमा व्यवसाय**—जपानांत हिंदी विमा व्यवसायाला क्षेत्र मिळवून देण्याच्या दृष्टीनें मध्यवर्ती सरकार विचार करीत आहे. सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुरन्सनें कलकत्त्यांतील हिंदी विमा कंपन्यांच्या संघटनेकडे, जपानला हिंदी विमा कंपन्यांचे प्रतिनिधी पाठविण्याची इच्छा आहे काय, अशी विचारणा केली आहे. ब्रिटिश व अमेरिकन विमा कंपन्यांचे प्रतिनिधी जपानला आधींच गेले आहेत. जपानमध्यें हिंदी विमा कंपन्यांनीं अद्याप धंदा केलेला नाहीं अशी माहिती मिळते.

**हिंदी उद्योगपती जर्मनीला जाणार**—हिंदी उद्योगधंद्यांना जर्मनींतील कोणती यंत्र सामुग्री उपयोगी पडण्यासारखी आहे हें प्रत्यक्ष पहाण्यासाठीं हिंदी उद्योगपतींचें एक मंडळ ब्रिटननें व अमेरिकेनें व्यापलेल्या जर्मनीच्या भागांत तीन आठवड्यांकरितां जाणार आहे.


## दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ, विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हें. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

## गोवर्धन डेअरी फार्म्स लि.

गोवर्धनवाडी, पुणें १.

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१ सरदार के. आर. विंचूरकर, बी. ए., एलएल. बी., जहागिरदार, पुणें ( चेअरमन )
२ सरदार व्ही. डी. पानसे, जहागिरदार, पुणें.
३ श्रीमंत जी. व्ही. साळवेकर, बी. ए., मुंबई.
४ श्री. एस. एस. निसळ, जहागिरदार व बँकर, अहमदनगर.
५ श्री. एस. जी. लोंबार, मर्चंट, पुणें.
६ सरदार अमरसिंहराव कदम, पुणें.
७ रावसाहेब वाय. डी. खोले, पुणें. ( स्पेशल डायरेक्टर )
८ श्री. व्ही. एस. सोलापूरकर, लँडलॉर्ड, पुणें. ( अधिकारपरत्वें )

—मॅनेजिंग एजंटस—

★ मेसर्स सोलापूरकर अँड डोणवाड ★

### कंपनीचीं वैशिष्ट्यें

★ कंपनीनें आधुनिक पद्धतीची यंत्रसामुग्री, ट्रॅक्टर वगैरे आणविली असून तिच्या सहाय्यानें शेतीचीं सर्व कामें करून घेणार आहेत.

★ कंपनीनें बाजारभाव सुमारें १ लक्ष रु. असलेली जमीन माफक किंमतीस मिळविली आहे.

★ कंपनीच्या डेअरीमध्यें फक्त गाई — सिंधी गाईच — आहेत.

★ पहिल्याच वर्षी कंपनीनें ६% व ३% डिव्हिडंड दिलें आहे.

### शेअर्स विक्रीस काढलेले आहेत.

डिपॉझिट रकमा स्वीकारल्या जातात.

| व्याजाचे दर— | १ वर्ष | २ वर्षें | ३ वर्षें |
|---|---|---|---|
| | ४% | ५% | ६% |

—अधिक माहितीसाठीं चौकशी करावी—

मॅनेजिंग एजंटस

# मुंबई शेअर बाजार

**( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )**

**साप्ताहिक बंद भाव**

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २९।७।४७ | बुधवार ३०।७।४७ | गुरुवार ३१।७।४७ | शुक्रवार १।८।४७ | सोमवार ४।८।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६१७-८; २५२७-८ | १००-१३-४ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | २१२० | २०६२—८ | २००५ | | २०१२—८ |
| ६३८; ४५७-८ | १९-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४११ | ४०१ | ३९१ | | ३९४ |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २८-१२ | २८—६ | २७-१० | | २८—० |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३५-१० | ३५—४ | ३४—८ | | ३५—६ |
| | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| १२७७-८; २१३२-८ | ४०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | ११३० | १०९० | १०८५ | | १०७७—८ |
| ११८०; ६५९ | ६-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६२० | ६०१ | ६०० | | ५८५—० |
| ९९९; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ६४१ | ६१५ | ६११ | | ६१२ |
| ५६७; ३९८ | २-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ३२७ | ३१५ | ३०७—८ | | ३१२ |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३११ | ३०४ | ३०१ | बाजार बंद | ३०० |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३४१ | ३२४ | ३२२ | | ३२२ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३५३ | ३४० | ३३४ | | ३४२ |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४—७ | ४—४ | ४—३ | | ४—७ |
| २९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १६—७ | १६—३ | १६-०-६ | | १५-१४ |
| ६-११-६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्ड्स | १ | ३—२—६ | ३—१ | ३—०-० | | ३-०-० |
| १०९२-८; ७३५ | २१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ६३२—८ | ६३२—८ | ६३० | | ५९६—४ |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १७६ | १७१—४ | १७० | | १७० |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २७३ | २७१ | २६८ | | २६६ |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५०६—४ | ४९० | ४७५ | | ४७३-१२ |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३३—० | ३२—६ | ३१-१३ | | ३१—३ |

## लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय

### शिक्षण संस्थांस विनंति

या संस्थेमार्फत चालूं असलेली संग्रहालयांतर्गत शिक्षण योजना नवीन वर्ष सुरूं झाल्याबरोबर सुरूं झाली आहे व या योजनेनुसार या शहरांतील प्रत्येक शाळेनें व प्रत्येक विद्यार्थ्यानें आपला फायदा करुन घ्यावा, असे प्रयत्न ही संस्था सदोदित करीत आहे. ही योजना यशस्वी आणि फलदायक होण्यासाठीं हें निमंत्रण सर्व शाळांना पाठविण्यांत येत आहे.

२. या संस्थेचा मुख्य विभाग मार्केट टॉवरवर आहे. दुसरा विभाग व्यापारसंवर्धन गृह व हिंदुस्थानची महशूर कारागिरी हा स्वतंत्र संग्रह विभाग कॉमन्वेल्थ विमा कंपनीच्या इमारतींत आहे. गोखले हॉल येथें मांडिलेलें पेटंट प्रदर्शन व जंगल विभाग, आणि जंगली महाराज रस्त्याच्या आंतल्या घोले रोडवरील जंगल इमारत व तेथील विस्तीर्ण जागा हीं सर्व महत्वाचीं व प्रेक्षणीय व शिक्षणप्रद स्थळें व खातीं आहेत. त्यांचा उपयोग कोणासहि करून घेतां येईल

३. संस्थेनें या शिक्षण योजनेच्या पुरस्कारासाठीं तज्ज्ञ शिक्षण तज्ज्ञांच्या नेमणुका केलेल्या आहेत व संस्थेकडे विचारपूस केली असतां विद्यार्थ्यांना वर्गपद्धतीनें शिकविण्याची व बोधप्रद पाठ देण्याची व्यवस्था होऊं शकते. तसेंच केवळ सहल म्हणूनहि कांहीं वर्ग आणिल्यास वर्गा बरोबर घेऊन, मार्गदर्शकाच्या नेतृत्वानें संग्रहालयांतील विभाग, सामान्य रीतीनें पहावयास येतात. शिक्षण संस्थांनीं असे वर्ग अवश्य धाडावेत व ते वरचेवर धाडावेत.

४. या संस्थेनें व्याख्यानमाला चालविली आहे व त्या मालेमध्यें अनेक उपयुक्त विषयांची चर्चा व अभ्यास होत असते. संग्रहालय संस्था व तिची सर्व खातीं सदासर्वदा प्रत्यहीं चालूं असतात व शिक्षणाची सोय केव्हांहि होऊं शकते. सुट्यांचे दिवशीं संग्रहालय मुद्दाम चालूं ठेवण्यांत येतो. त्याचाहि जिज्ञासु शिक्षकांनीं उपयोग करून घ्यावा. ही संस्था सतत वाढत आहे व तिचे द्वारें नवीन नवीन विषय शिक्षण योजनेंत अंतर्भूत होऊन शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांच्या पुढें येत आहेत व संस्थेचें कार्यक्षेत्र सतत वाढत आहे.

५. संस्थेनें मुख्यतः खालील यादींत दाखविलेले विषय शिकविण्याची व्यवस्था केली आहे.

( १ ) हिंदुस्थानची महशूर कारागिरी.
( २ ) पेटंट व शोध.
( ३ ) जमशेटजी टाटा यांचें चरित्र.
( ४ ) लोखंड व पोलाद.
( ५ ) लाखेची पैदास व उपयोग.
( ६ ) छोटेखानी धंद्यांतून निर्माण होणाऱ्या वस्तूंचा संग्रह.
( ७ ) कांच तयार करण्याची कृति.
( ८ ) गळिताचीं धान्यें, तेलें, तेल गाळणें, तेलाचे उपयोग, शुद्धिकरण, साबण.
( ९ ) पाणीपुरवठा व शुद्धीकरण.
( १० ) निरानदीचे कालवे व त्यांचा शेतीचे वाढीस उपयोग.
( ११ ) हिंदुस्थानची जंगल संपत्ति.
( १२ ) रबर.
( १३ ) साबणाचा उद्योगधंद्यांत उपयोग.
( १४ ) विश्वाचें रहस्य ( इंग्रजींतून ).

भा. वि. वारपुरे.
क्यूरेटर.

## ★ ही विजयपताका अखंड फडकत राहील ★

★ विमेदारांचें हितसंरक्षण. ★ संपूर्ण आर्थिक स्थैर्यता.
★ मध्यवर्ती सरकारकडे भांडवलापैकीं भरपूर ठेव
★ व पहिलेंच मूल्यमापन यशस्वी.

याच कंपनींत विमा उतरून आपला व कंपनीचा भविष्य काल उज्ज्वल करा.

पूर्ण काम रु. ७२,९३,२००
एकूण जिंदगी रु. ३,४१,७३०-५-९
रिन्युअल खर्चाचें प्रमाण १६·७ टक्के
आयुर्विमा निधी रु. २,४५,५३६-६-९

सर्व प्रकारच्या विम्यासाठी

## दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनी लि. पुणें २

—प्रतिनिधित्वासाठीं लिहा—

त्र्यं. दा. देशपांडे, बी. ए., एलएल. बी., सेक्रेटरी
व. न. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी., मॅनेजर

सोलापूर येथील कंपनीच्या वसाहतीच्या योजना तयार होत असून लवकरच बंगले बांधण्याचें काम सुरू होईल.

## आरको


प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू
आरको निलगिरी तेल
लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें




## धूतपापेश्वर औषधें

**श्री धूतपापेश्वर पनवेल लिमिटेड** पनवेल-कुलाबा




पुणें डेपो—सिटी पोस्टासमोर, : नागपूर—महाल रोड,
कोल्हापूर—महाद्वार रोड.

## हिंदी शेतीच्या जनावरांचा विमा

### तज्ज्ञ कमिटीची नेमणूक होणार

ले:—श्री. वी. एन्. सहस्त्रबुद्धे

इन्शुअरन्स ॲडव्हायसरी कमिटीच्या पोस्ट वॉर सब कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. त्यावर "अर्था" मध्यें ता. ११ जून रोजीं अग्रलेखहि आला आहे. जनावरांच्या विम्याचे अभावासंबंधीं प्रस्तुत रिपोर्टांत उल्लेख आलेला आहे. तेवढ्या पुरत्याच भागाचें परीक्षण येथें करण्याचा तूर्त उद्देश आहे. "आपल्या देशांत सध्यां तरी जनावरांचा विमा कोणाला माहीत नसल्यासारखाच आहे" असें विधान रिपोर्टांत आढळतें. हिंदी विमा वार्षिकांच्या अभ्यासकांस, दि प्रॉव्हिन्शिअल ( लाइफ, हॉर्स अँड कॅटल ) विमा कंपनी १९१२ सालीं स्थापन होऊन ती १९२३ च्या सुमारास लिक्विडेशनमध्यें गेली, हें परिचित आहेच. १९२९ सालीं मद्रास प्रांतांत कॅटल इन्शुअरन्सच्या चार कंपन्या स्थापन झाल्या, त्याचप्रमाणें पंजाबमध्येंहि एक निघाली; परंतु त्यांचें पुढें काय झालें तें समजत नाहीं. अर्थात्, स्थापनेनंतर दोन तीन वर्षांतच त्या लिक्विडेशनमध्यें गेल्या हें उघड आहे. कारण, दोन तीन विमा वार्षिकांत त्यांचीं नांवें आढळतात परंतु पुढें तीं गळलीं आहेत. १९२९ ते १९३५ ह्या काळांत निघालेल्या ह्या कंपन्यांच्या व्यवहाराची नोंद ठेवण्याची आवश्यकता मध्यवर्ती किंवा प्रांतिक सरकारांस भासली नाहीं काय? हिंदुस्थानसारख्या शेतीप्रधान देशांत जनावरांच्या विम्याकडे इतकें दुर्लक्ष्य होणें अक्षम्य आहे. ज्या देशांत ह्या विम्याचा प्रसार झालेला आहे, अशा ठिकाणचा अनुभव एकत्रित करून आणि हिंदुस्थानांत अशा विम्यास किती वाव आहे ह्याची चौकशी करून त्यास चालना देणें आवश्यक नाहीं काय? इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च ह्याबाबतींत आतां जागें झालेलें दिसतें. २० जूनची दिल्लीची असोसिएटेड प्रेसची खालील तार पहा:—"हिंदुस्थानांत पायाशुद्ध रीतीनें कॅटल इन्शुअरन्स सुरू करण्याच्या शक्यतेचा विचार करण्यासाठीं इं. कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च एका तज्ज्ञ कमिटीची नेमणूक करणार आहे. ह्या कमिटींत विमागणिती व विमा तज्ज्ञ ह्यांचा समावेश होईल." कमिटीच्या शिफारसीवरूनच बहुधा इं. कौन्सिलनें हें पाऊल टाकलें असावें. कमिटीच्या शिफारसी प्रमाणें जनावरांच्या विम्याचा प्रसार येथें लवकर व्हावा अशीच विमा व्यवसायिकांची इच्छा आहे.

---

**मध्यवर्ती वैद्यकीय संस्था**—दिल्ली येथें ५ कोटी रुपये खर्चून एक मध्यवर्ती वैद्यकीय संस्था स्थापन करण्यांत येणार आहे. अमेरिकेंतील जॉन हॉपकिन्स मेडिकल कॉलेजच्या धर्तीवर ही संस्था चालविण्यांत येणार आहे. संस्था मुख्यत: संशोधन व शिक्षण देणारी राहील.

**ब्रिटनचें कोळशाचें उत्पादन**—१९४७ च्या पहिल्या २३ आठवड्यांत ब्रिटनमध्यें १०,५५,३४,८०० टन कोळसा खाणींतून बाहेर काढण्यांत आला. गेल्या वर्षीच्या ह्याच काळांतील कोळशापेक्षां हा आंकडा ४,१७,००० टनांनीं जास्त आहे. कोळशाच्या खाणींतून ५ दिवसांचा आठवडा केल्यापासूनच्या १० आठवड्यांत, ह्याच काळांतील गेल्या वर्षीच्या उत्पादनापेक्षां ६,८९,००० टन अधिक कोळसा बाहेर काढण्यांत आला.


कृष्णा शुगर मिल्स लिमिटेड

डिस्टिलरी लवकरच सुरू होणार

ठराविक मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.


६% क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स विकणें आहेत.

-संचालक मंडळ-

रावबहादुर व्ही. व्ही. यारगोप, बी. ए., एलएल. बी., दिवाण, मिरज ज्यूनिअर स्टेट; श्री. डी. व्ही. गर्दे, बी. ए., एलएल. बी., डिस्ट्रिक्ट जज्ज व हुजूर चिटणीस, मिरज ज्यूनियर स्टेट; श्री. एस. एस. निसळ, अहमदनगर; श्री. एन. एस. गोडबोले, पुणें; श्री. के. बी. देसाई, कोल्हापूर; सरदार व्ही. बी. महागांवकर, कोल्हापूर; राजा बी. एल. सरदेसाई, वंटमुरी; दिवाणबहादुर एस. डी. मानवी, गदग; श्री. एस. जी. मराठे, बी.ई., पुणें; श्री. बी. वी. पोतदार, बी.ए., एलएल.बी., बेळगांव; सरदार के. आर. विंचूरकर, ( एक्स-ऑफिशिओ ) पुणें. अधिक माहितीसाठीं लिहा—

कृष्णा-कित्तूर जिल्हा बेळगांव. | विंचूरकर आणि कंपनी, मॅनेजिंग एजंटस्.





अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या!

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

## अन्नपदार्थांचा प्रचंड कारखाना

( श्री. नानासाहेब पुराणिक, ह्यांची एक मुलाखत )



श्री. नानासाहेब पुराणिक, पनवेल.

इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, जर्मनी, स्वीडन, इटली, स्वित्सर्लंड, फ्रान्स इत्यादि पाश्चात्य देशांतील प्रमुख कारखान्यांची औद्योगिक-दृष्ट्या पहाणी श्री. नानासाहेब पुराणिक ह्यांनीं नुकतीच केली. अखिल भारतीय कारखानदार संघाच्या शिष्टमंडळाचे ते एक सभासद होते, हें "अर्थ"च्या वाचकांस माहीत आहेच. त्यांच्या एका मुलाखतींतील कांहीं बाबींचा उल्लेख येथें केला आहे. "कॉर्न फ्लेक्स्" विषयीं वाचकांना कल्पना असेलच. आपल्याकडे बाजारांत मिळणारे गव्हाचे पोहे ("व्हीट ब्लॉसम्स्"), भाताचे पोहे, इत्यादि जसे प्रकार आहेत त्याच्या कितीतरी पटीनें मोठ्या प्रमाणावर धान्यापासून केलेले खाद्यपदार्थ अमेरिकेंत ब्रेकफास्टमध्यें येतात. १९०६ सालीं कॉर्न फ्लेक्स् तयार करण्यास सुरवात झाली, आणि आज मका, गहूं, तांदूळ, व्हाइट ग्रेन इत्यादि धान्यांपासून पेप, ब्रॅनफ्लेक्स्, राइस क्रिसपीज, बिस्क्रिटें, ऑलब्रॅम इत्यादि प्रकार तयार करण्यांत येतात. हे खाद्यपदार्थ त्या देशांतून अत्यंत लोकप्रिय झाले असून वर्षाला कोट्यावधि डॉलर्स किंमतीचा माल तयार करून जगभर त्याचा प्रसार केला जातो.

"केलॉग"च्या या एका कारखान्याचा वार्षिक खप साडेसात कोटी डॉलर्स एवढा आहे. डॉलरची किंमत ३॥ रुपये धरून रुपयांत किंमत काढल्यास वार्षिक खप सुमारें २६,००,००,००० रुपयांचा होतो! या अन्नपदार्थांची किंमत १९२१ सालच्या किंमतीपेक्षा आज २५ टक्यांनीं कमी आहे असेंहि त्यांनीं सांगितलें. या एका कारखान्यामध्यें ५,८०० माणसें काम करतात. पाश्चात्य देशांतील कारखान्यांतून यंत्रांची योजना विशेष असते व त्यामुळें प्रत्यक्ष माणसें कमी पुरतात हें लक्षांत घेऊन काम करणाऱ्या माणसांच्या या संख्येकडे पहावें लागतें. "केलॉग" कंपनीच्या बॅटलक्रीक येथील या मुख्य कारखान्याशिवाय कॅनडा, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया इ. ठिकाणींहि कारखाने आहेत.

कंपनीचा मूळ संस्थापक डॉ. डब्ल्यु. के. केलॉग हा ९२ वर्षांचा वृद्ध नुकताच मरण पावला. "केलॉग फाउंडेशन" नांवाची एक संस्था त्यांनीं स्थापन केली असून एक मोठें सॅनिटोरियमहि त्यांनीं चालविलेलें आहे. या सॅनिटोरियममधून विशेषतः आहार, स्नान, अभ्यंग स्वरूपाची चिकित्सा केली जाते. स्वित्सर्लंडमध्यें बर्न येथें ओव्हलटिन फॅक्टरी आहे. ओव्हलटिनमध्यें अंडीं असतात हें वाचकांना माहीत असेलच. या फॅक्टरीमध्यें एका तासाला ६,००० अंडीं फोडणारें व वाईट अंड्यांचा बलक वगळता येण्याची योजना असणारें नमुनेदार मशीन आहे.

### अमेरिकेंतील औषधिनिर्मिती

औषधिनिर्मितीच्या कारखान्यांमध्यें विशेषतः पार्क डेव्हिस, ॲबट, मर्क, क्विब्ज्, बायर्स, सिबा, लेडर्ले, ए. बी. ॲस्ट्रा, ग्लॅक्सो लॅबोरेटरी, बूटस् इत्यादि निरनिराळ्या देशांतील कारखान्यांपैकीं स्टॅंडर्डाइज्ड् प्रॉडक्टस् तयार करणारी पार्क डेव्हिस ही जगांतील पहिली कंपनी आहे. यांच्या डेट्रॉइट येथील कारखान्यामध्यें ४,००० माणसें काम करतात. एकूण २५० माणसें संशोधन कार्यामध्यें गुंतलेलीं आहेत. या कारखान्याच्या इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, ऑर्जेंटिना, मेक्सिको, आणि क्युबा या ठिकाणीं औषधीनिर्मितीच्या शाखा आहेत. गेल्या पांच वर्षांमध्यें अमेरिकेनें तिप्पट माल तयार केला आणि पूर्वीच्या सातपट माल बाहेर निर्यात केला! १९४५ मध्यें अमेरिकेनें पांचपट तर इंग्लंडनें दुप्पट व स्वित्सर्लंडनें दीडपट औषधिकल्प तयार केले.

युनायटेड स्टेटस्मध्यें औषधि कारखान्यांची संख्या १,२०० आहे व त्यांत ३०,००० माणसें काम करतात. टॉयलेटस् तयार करणारे कारखाने ६०० असून त्यांमधून १५,००० माणसें काम करतात. साबणाच्या कारखान्यांची संख्याहि ६०० असून तेथेंहि १५,००० माणसें काम करीत असतात.

हा प्रॉस्पेक्टस नसून जाहिरात आहे.

# चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्ट्स लि.

रजिस्टर्ड ऑफिसः—वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फिरोजशहा मेथा रोड, कोट, मुंबई.

वाढत्या धंद्यासाठीं कंपनी खालील दरानें ठेवी स्वीकारते

**ठेवी : मुदत वर्षें– १ २ ३ ४ ५ते७**

व्याजाचा दर–द. द. शेंकडा. ३% ३½% ४% ४½% ५%

**शेअर्स :** आतां फारच थोडे शेअर्स शिल्लक असून अर्जदारांना थोड्या प्रमाणांत देण्यांत येतील.

कंपनीचें चिरस्थायित्व व आर्थिक मजबुती दाखविणारे आंकडे—

कंपनींत शेअर्स व ठेवींच्या रूपानें गुंतलेलें भांडवल

ठेवी : १५,५७,१२५

वसूल शेअर–भांडवल : १४,६९,९२५

एकूण रु. ३०,२७,०५०

कंपनीचा घसारा व इतर रिझर्व्ह फंडाची एकूण रक्कमः - रु. ४,८१,५०१

यंदाचें गूळ, फळें व धान्य यांच्या विक्रीचें अंदाजिलेलें उत्पन्न रु. १७,००,००० ( अदमासें )

कंपनीनें आपल्या ऑर्डिनरी शेअर्सच्या वसूल भांडवलावर आतांपर्यंत एकूण ५०% डिव्हिडंड दिलेलें आहे.

कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसच्या पत्यावर पत्रव्यवहार करून शेअर–अर्जाचा फॉर्म, प्रॉस्पेक्टस, ठेवीचा फॉर्म व माहितीपत्रकें मागवून घ्या.

चितळे ब्रदर्स, मॅनेजिंग एजण्ट्स.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.